# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### वाडा (जि.पालघर) तालुक्यातील भात खरेदी केंद्रावर भात भरण्यासाठी गोणी उपलब्ध करुन देणेबाबत

**(१) १३१८ (०९-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी, मानिवली, गो-हे, गुहीर, पोशेरी, कोनसई, सारशी, खैरे-आंबिवली (ता.वाडा, जि.पालघर) या ठिकाणी सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत भात खरेदी केंद्रावर भात भरण्यासाठी गोणी उपलब्ध होत नसून आदिवासी शेतकऱ्यांच्या भाताचे नुकसान होत असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भात खरेदी केंद्रावर भात घेऊन आलेल्या शेतकऱ्यांना गोणी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच भात खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (१०-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) भात खरेदी केंद्रावर गोणी उपलब्ध नसल्याबाबत शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार महामंडळाला प्राप्त झालेली नाही. शासनाचे शासन निर्णय क्र.खरेदी ११२४/ प्र.क्र.१६०/नापु-२९ दिनांक १४/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार धानाची खरेदी झालेली आहे.

(३) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य शासनाने नवीन वाळू धोरणाचा मसूदा तयार करून अंमलबजावणी करणेबाबत

**(२) २१४७ (१५-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नवीन वाळू धोरणाचा मसूदा तयार केला असून, या मसुद्यावर प्रसिध्दी पत्रक जाहीर करून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वाळू धोरणबाबतचा अंतिम मसूदा तयार करुन मसुदयाबाबतची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०३-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करुन देण्यास क्षेत्रियस्तरावर आलेल्या अडचणी, डेपोपध्दती व लिलावपध्दती यामधील गुण-दोष, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन दिनांक ३०/०१/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ च्या अनुषंगाने हरकती/सूचना मागविण्यात आल्या होत्या.
(२) प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन वाळू/रेती धोरण दिनांक ०८/०४/२०२५ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आले होते. मा.मंत्रिमंडळाने याबाबत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन शासनामार्फत वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री बाबतचा दिनांक १६/०२/२०२४ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन दिनांक ०८/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण -२०२५ निर्गमित केले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीबाबत

**(३) २२२८ (१४-०४-२०२५) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती देण्यासंदर्भात ४०३ शाळांनी रीतसर नोंदणी न केल्याने शाळेतील पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहावे लागले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे हे काय,
(२) असल्यास, शाळा प्रशासनाच्या चुकीमुळे शिष्यवृत्ती पासून वंचित ठेवणाऱ्या शाळा प्रशासनावर कारवाई करण्याबाबत तसेच पात्र असूनही वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी दिनांक २१/०३/२०२५ नुसार सर्व शाळांकडून ऑफलाईन प्रस्ताव मागणी केले होते. त्यानुसार सर्व शाळांनी ऑफलाईन अर्ज सादर केलेले होते. प्राप्त अर्जांमधून पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा केली आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिलेले नाहीत.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात वन्य प्राण्यांकडून शेतीच्या होत असलेल्या नुकसानीबाबत

**(४) २५०७ (१०-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात गवे, रानडुकर, हत्ती, माकडे या वन्य प्राण्यांचा उपद्रव वाढल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांनी केलेल्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामे वेळेत होण्यासाठी तसेच ५० हजारापर्यंत केलेल्या नुकसान भरपाई चे अधिकार वनक्षेत्र अधिकाऱ्यांच्या स्तरावर ठेवावे तसेच शेतकऱ्यांवर दाखल करण्यात येणारे ३५३ चे गुन्हे काढून टाकावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात गवे, रानडुकर, हत्ती, माकडे या वन्य प्राण्यांचा उपद्रव रोखण्याबाबतची कारवाई तसेच शेतकऱ्यांवर दाखल करण्यात येणारे ३५३ चे गुन्हे काढून टाकण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०३-१०-२०२५) :** (१) कोल्हापूर वनवृत्तामध्ये सन २०२५-२६ मध्ये (माहे मे, २०२५ अखेरपर्यंत) वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याचे ३९४४ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रस्तुत प्रकरणे प्रचलित नियमातील तरतुदीनुसार संबंधित नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना रुपये २३८.७१ लक्ष निधी अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) व (३) दिनांक २४/०३/२०२५ रोजी कोल्हापूर वनवृत्तात कडगांव वनपरिक्षेत्र कार्यालयासमोर ग्रामस्थांनी आदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर वनपरिक्षेत्रामध्ये नुकसान भरपाईचे पंचनामा करतांना सरकारी कामात अडचण निर्माण करणे, दबाव टाकण्याचा प्रयत्न करणे, भोंग्याद्वारे वन विभागाच्या विरोधात प्रचार करणे इत्यादी प्रकरणी पोलीस विभागामार्फत भारतीय न्यायसंहिता, २०२३ कलम १३२, २२१ व ३(५) अंतर्गत फक्त ३ व्यक्तींविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही पोलीस विभागामार्फत सुरु आहे.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- महाराष्ट्र वन्य प्राण्यामुळे झालेली, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ या कायद्यातील तरतुदीनुसार मृतांच्या कायदेशीर वारसास व नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक/भित्तीपत्रकाद्वारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्राण्यांना वनातच गवत/चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासावी कामे करण्यात येतात.
- हिंस्त्र प्राण्यांचे मानवांवरील हल्ले कमी करण्यासाठी आर्टिफिशल इंटेलिजन्स (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर काही ठिकाणी केला जात असून भविष्यात मोठ्या प्रमाणात वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतुदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी बांधवासाठी खावटी अनुदान योजना पुन्हा नव्याने सुरु करण्याबाबत

**(५) २९२१ (१०-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील : दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक २१९२८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागांतील बेरोजगार व गरजू लोकांना पशुपालन, शेती व लघुउद्योगासाठी अल्पकालीन आर्थिक मदत देऊन स्वावलंबी बनवण्यासाठी सुरू असलेली खावटी अनुदान योजना बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर योजना बंद करण्याची कारणे काय आहेत तसेच आदिवासी बांधवांसाठी महत्वाची असलेली सदर योजना पुन्हा नव्याने सुरु करण्याकरीता शासनास प्रस्ताव सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदर योजना केव्हापर्यंत सुरु करण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२४-०७-२०२५) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य सहाकारी आदिवासी विकास महामंडळाकडून राबविण्यात येणारी खावटी कर्ज योजना सद्य:स्थितीत कार्यान्वित नाही. तथापि, शासनाच्या मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी दिव्यांग, विधवा, निवृत्तीवेतन अनुदान योजना, मोफत अन्नधान्य वाटप योजना इत्यादी योजनांमधून अनुसूचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मेहुणबारे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील वन परिक्षेत्रात वन्य पशूंची शिकार करणाऱ्या दोषींवर कारवाई होणेबाबत

**(६) ३०५३ (१०-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहुणबारे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील वन परिक्षेत्र जंगलातील हरणांची बेकायदेशीर शिकार करण्यात आली असून संबंधित शिकारी घटनास्थळावरून फरार झाल्याची घटना दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेहूणबारे येथील वन परिक्षेत्र जंगलातील हरणांची बेकायदेशीरित्या शिकार करणाऱ्या संबंधित शिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.गणेश नाईक (०३-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वनपरिक्षेत्र अधिकारी, चाळीसगाव व उपस्थित क्षेत्रिय कर्मचारी यांनी वाहनातील मृत ५ काळवीट व काळवीट शिंगे २ असा मुद्देमाल व वाहन जप्त करून वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ चे कलम २, ९, ३९ (ए) (बी) (डी), ४४, ४८ए, ४८ बी(२), ५४ अन्वये दिनांक ३०/०४/२०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी नावे वकील अहमद शकील अहमद रा. मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक यास प्राप्त पुराव्यावरून अटक करण्यात आली. अटक आरोपीस दिनांक ०३/०५/२०२५ रोजी न्यायदंडाधिकारी वर्ग-१ चाळीसगाव यांचेसमोर हजर केले असता सदर आरोपीस दिनांक १७/०५/२०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. तसेच फरार ६ आरोपींच्या शोधाबाबत पोलीस विभाग, जळगाव, सायबर सेल, चाळीसगाव, पोलीस विभाग, मालेगाव, पोलीस विभाग, धुळे व वन विभाग धुळे यांची वेळोवेळी मदत घेऊन फरार आरोपींना पकडणेकरीता कार्यवाही सुरू आहे.

---

## राज्यात कृषी विभागातील कृषी सहाय्यकांना पदोन्नती देण्याबाबत

**(७) ३०७३ (१०-०७-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागातील कृषी सहाय्यकांना पदोन्नती देताना कृषी पर्यवेक्षक पदासाठी १:६ हे प्रमाण लागू असल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदोन्नतीचे प्रमाण १:४ करण्यात यावे अशी मागणी कृषी सहाय्यकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागातील कृषी सहाय्यकांना पदोन्नती देताना १:६ ऐवजी १:४ हे प्रमाण करण्याबाबतची मागणी मान्य करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

कृषी विभागात सहायक कृषी अधिकारी (कृषी सहायक) यांची ११५९९ पदे व उप कृषी अधिकारी (कृषी पर्यवेक्षक) यांची २७२६ पदे मंजूर आहेत. त्यामुळे पदोन्नतीचे प्रमाण ४:१ इतके आहे. सबब, संबंधित कर्मचाऱ्यांवर पदोन्नती देताना अन्याय होत नाही.
(२) हे खरे आहे.
सदर पदोन्नतीचे प्रमाण ४:१ करण्यात यावे अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली आहे.
(३) कृषी विभागाचा आकृतिबंध सुधारित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेळघाटातील सी -१ ही गर्भवती वाघीण मध्य प्रदेशात मृतावस्थेत आढळून आल्याबाबत

**(८) ३१०९ (१०-०७-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील चार महिन्यात २० वाघांचे मृत्यू झाले असून मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सी-१ ही गर्भवती वाघीण मध्यप्रदेशातील शाहापूर गावाच्या सीमेजवळील जांभूपाणी वननाका, चौडी बीट, कक्ष क्र. ४२८ अंतर्गत मृतावस्थेत आढळून आल्याचे तसेच सदर मृत वाघिणीच्या पोटातून तीन बछड्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आल्याचे दिनांक २ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाघिणीच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली तसेच वाघाच्या संवर्धनासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०४-०९-२०२५) :** (१) दिनांक ०२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास सी-१ वाघीणीचा मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर क्षेत्रात मृत्यू झाल्याबाबत माहिती प्राप्त झाली होती. सदर वाघिणीचे पोटात तीन बछडे होते किंवा नाही याबाबतची माहिती उपलब्ध नाही. सन २०२३ चे सुमारास आकोट वन्यजीव विभागांतर्गत असलेल्या अंबाबारवा अभयारण्यामध्ये T-२२ या वाघिणीचे वास्तव्य असल्याचे निदर्शनास आले होते. भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडून यांनी केलेल्या Phase-IV सर्व्हेक्षणात सदर मृत वाघिण सी-१ ही मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील T-२२ या वाघिणीचा बछडा असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सदर वाघिणीच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या व्यक्तींविरुध्द मध्यप्रदेश वन विभागाने कोणती कार्यवाही केली याबाबत माहिती उपलब्ध नाही. तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वाघांचे संवर्धनासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना व कार्यवाहीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

- संरक्षणाच्यादृष्टीने संवेदनशील स्थळे निश्चित करून त्या ठिकाणी चेक नाक्यांची उभारणी करण्यात आली आहे व सदर ठिकाणी २४ तास वनकर्मचारी व मजुर यांची नियुक्ती करून संरक्षण केले जाते.
- मेळघाट व्याघ्रप्रकल्पांतर्गत असलेल्या कार्यक्षेत्रामध्ये वाघांचे नियमित Monitoring केले जाते.
- गस्तीकरीता MSTriPE या पध्दतीचा अवलंब केला जातो, जिथे GPS द्वारे ट्रॅक घेऊन सर्व वनक्षेत्रात गस्ती नियमीत होईल याची दक्षता घेतली जाते.

- कोणताही वनगुन्हा उघडकीस आल्यास नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
- वनसंरक्षण करण्याकरीता मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत एक सायबर सेल स्थापन केला. त्याद्वारे प्रभाविरीत्या वनसंरक्षणाची कामे करण्यात येतात.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रात शिकार प्रतिबंधक तसेच संरक्षणाची मुख्य उपाययोजना म्हणून संवेदनशील क्षेत्रात संरक्षण कुटी उभारून तेथे मजुर, वनरक्षक असा संरक्षण दल कार्यरत ठेवण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात अंदाजे १०९ संरक्षण कुट्या स्थापन करण्यात आले आहे. वायरलेस स्टेशन हे २४ तास सुरु असतात व २४ तास माहिती मुख्यालयी वेळोवेळी देण्यात येते.
- सर्व नियतक्षेत्रामध्ये ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरा लावून त्याद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवून त्यांचा मागोवा घेण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यात पर्यटकाने काढलेल्या चित्रफितीवरून एक वाघ जखमी अवस्थेत आढळून आल्याबाबत

**(९) ३११० (१७-०७-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यात सफारीदरम्यान पर्यटकाने काढलेल्या चित्रफितीद्वारे एक वाघ जखमी अवस्थेत आढळून आल्याची घटना संबंधित पर्यटकांनी वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्याची गंभीर बाब दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन महिन्यांच्या कालावधीत टिपेश्वर अभयारण्यासह नागझिरा, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व अन्य काही संरक्षित क्षेत्रांत वाघ जखमी अवस्थेत आढळल्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच वन्यप्राण्यांना जखमी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०३-१०-२०२५) :** (१) दिनांक २५/०४/२०२५ रोजी टिपेश्वर अभयारण्यात सफारी दरम्यान पर्यटकाने काढलेल्या चित्रफितीमध्ये वाघ PKT-T८ (वीर) जखमी अवस्थेत असल्याचे आढळून आला. तद्नंतर वन कर्मचारी व रेस्क्यु टीमने PKT-T८वाघिणीचा मागोवा घेण्यासाठी ट्रॅप कॅमेरे व ड्रोन कॅमेराचा वापर केला असता सदर वाघ सुखरुप/सुस्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) दिनांक २५/०४/२०२५ रोजी मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती येथे नैसर्गिक कारणामुळे एक वाघ तर दिनांक १३/०५/२०२५ रोजी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर येथे आपसी झुंजीमुळे एक वाघ जखमी झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(३) वाघ व बिबट्यांच्या संरक्षनार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-• जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.

- अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद गतीविधींवर लक्ष ठेवण्यात येते.
- अतिसंवेदनशील क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी, निरीक्षण मनोरे व तपासणी नाके तयार करण्यात आले आहेत.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.
- वन विभागातील अतिक्रमण, वन्यप्राण्यांची शिकार, वनवणवा इत्यादी गुन्ह्यांची माहिती प्राप्त होण्याकरीता १९२६ हा हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वयीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रोजगार हमी योजना अंतर्गत मजुरांना रोजंदारी मोबदला वाढविणेबाबत

**(१०) ३२८२ (१०-०७-२०२५) श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजना अंतर्गत मजुरांना फक्त ३१२ रुपये रोजंदारी मोबदला देण्यात येतो तसेच सदर मजुरांसाठी कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजना अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांसाठी अंगणवाडी तसेच इतर शिक्षणाची सोय जवळपास करण्यात येत नसल्याने मजुरांची मुले शिक्षणापासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना पिण्याच्या पाण्याची सुविधा, लहान मुलांसाठी पाळणाघर, निवारा, प्रथमोपचार साहित्य, जखमींना वैदयकीय मदत व मृतांना नुकसान भरपाई, प्रवासभत्ता व इतर सोईसुविधा देय असतानाही त्यांना सदर सुविधा उपलध करुन देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रोजंदारी मोबदला वाढवण्यासाठी तसेच कामांच्या ठिकाणी तातडीच्या वैद्यकीय सुविधेसह इतर सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (२७-१०-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करताना लहान-सहान जखमांवर आणि कामामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या इतर समस्यांवर तातडीने उपचार करण्यासाठी पुरेशा साहित्यासह असलेली प्रथमोपचार पेटी या सुविधा पुरविण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामाच्या ठिकाणी कामगारांना वैद्यकीय मदत, पिण्याचे पाणी, निवारा व कामाच्या ठिकाणी ५ वर्षे वयापेक्षा कमी वयाच्या बालकांच्या देखभालीसाठी वयस्कर स्त्री मजुराकडे जबाबदारी सोपविणे इ. सेवा अनुज्ञेय आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामरोजगार सेवकांचे अनुदान प्रलंबित असलेबाबत

**(११) ३३२५ (१०-०७-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील मजुरांना किमान १०० दिवसांचे काम त्यांच्या निवासस्थानापासून ५ किमीच्या परिसरात उपलब्ध करून देण्यासाठी, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत (मनरेगा) ग्रामरोजगार सेवकांची नियुक्ती दिनांक २६ जानेवारी, २००८ रोजी ग्रामसभेच्या माध्यमातून मानधन तत्त्वावर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही महिन्यांपूर्वी राज्यातील ग्रामरोजगार सेवकांना प्रतिमाह रुपये ८,०००/- इतके मानधन देण्याचा निर्णय घेतला असून, सहा महिन्याचा कालावधी होऊनही अद्यापि संबंधित सेवकांना मानधन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत (मनरेगा) ग्रामरोजगार सेवकांना मानधन लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (२०-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक ०२ मे २०११ अन्वये ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती केली जाते.

(२) व (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्राम पातळीवर काम करणाऱ्या ग्राम रोजगार सहायक यांना प्रतिमाह रुपये ८,०००/- मानधन व इतर आनुषंगिक भत्ते देण्यासंदर्भात दिनांक ०३/१०/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणीकरीता नवीन लेखाशीर्ष विभागास प्राप्त झाले असून विधानमंडळाच्या जून, २०२५ च्या

पावसाळी अधिवेशनात मानधन अदा करण्याच्या अनुषंगाने लाक्षणिक पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला होता.त्याप्रमाणे, विधानमंडळाच्या डिसेंबर, २०२५ मध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात ग्रामरोजगार सहायकांना मानधन अदा करण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची बाब विभागाकडून प्रस्तावित आहे.

दरम्यानच्या कालावधीत ग्रामरोजगार सहायक यांना फेब्रुवारी, २०२५ पर्यंतचे मानधन जुन्या दराने अदा करण्यात आले आहे. तसेच ग्रामरोजगार सहायकांना मार्च, २०२५ पासूनचे मानधन पुढील आदेश होईपर्यंत वा निधी उपलब्ध होईपर्यंत जुन्या दराने अदा करण्याची कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, मनरेगा यांना निदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात १ जानेवारी ते एप्रिल, २०२५ या कालावधीत १ हजारांहून अधिक वणवे लागल्याबाबत

**(१२) ३४२० (१०-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जानेवारी ते एप्रिल, २०२५ या कालावधीत एक हजारांहून अधिक वणवे लागल्याची नोंद झाली असून, ही संख्या गतवर्षाच्या तुलनेत दुप्पट असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या अखेरीस निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वणव्यांमुळे राज्यातील जैवविविधता, वनसंपत्ती, वन्य प्राणी, शेती, पशुधन अथवा अन्य प्रकारची संपत्ती यांचे किती प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच सदर वणवे कोणत्या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घडले असून यामागील प्रमुख कारणे व त्याबाबतचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, सदर घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व भविष्यात वणव्यांस प्रतिबंध घालण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०४-०९-२०२५) :** (१) राज्यात दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते एप्रिल, २०२५ या कालावधीत ४५४६ वणवे लागल्याची नोंद झाली असून, गतवर्षी याच कालावधीत ७७८१ इतके वणवे लागलेले आहेत.

(२) या वणव्यांमुळे राज्यातील जैवविविधता, वनसंपत्ती, वन्यप्राणी, शेती, पशुधन अथवा अन्य प्रकारची संपत्तीचे नुकसान झालेले नसून दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते एप्रिल, २०२५ कालावधीमध्ये जंगलातील वाळलेले गवत व पालापाचोळा जळून रुपये ४३.२३ लक्ष इतके नुकसान झाले असून गडचिरोली जिल्ह्यामध्ये सगळयात जास्त १७१२ इतक्या आगीच्या घटना घडलेल्या आहेत. वनक्षेत्रात मुख्यत्वे खालील बाबींमुळे वनवणवा लागण्याची शक्यता असते :-

१. वनवणव्याच्या घटना ह्या प्रामुख्याने मानव निर्मीत असून वनक्षेत्रालगत असलेली शेती व त्यामधील जाळण्यात येणारा पालापाचोळा याद्वारे देखील वनक्षेत्रात आगीचा शिरकाव होऊन वनवणवा लागणाच्या घटना घडत असतात.

२. मोहफुले वेचण्याकरीता तसेच तेंदू पत्ता करीता आगी लावल्या जातात.

३. वनक्षेत्रातून अथवा वनक्षेत्राच्या नजिकच्या क्षेत्रातून गेलेल्या विद्युत वाहिनीतून होणाऱ्या शॉर्टसर्कीटमुळे तसेच बरेचसे प्रवासी प्रवास करताना विडी, सिगारेट अर्धवट फेकून दिल्याने देखील मोठ्या प्रमाणात वनवा लागल्याचे प्रकार निदर्शनास येतात.

(३) जंगलात आग लागणाऱ्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व भविष्यात वणव्यास प्रतिबंध घालण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून वनक्षेत्रा सभोवती जाळरेषा घेण्यात येतात.

२. आगीच्या हंगामात १५ फेब्रुवारी ते १५ जून या कालावधीत नियतक्षेत्रात फायर वॉचरची नेमणूक प्रत्येक वनक्षेत्रात करण्यात येते व त्यांना आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करुन देण्यात येते.

३. २४X७ करीता नियंत्रण कक्षाची स्थापना करुन आगीच्या घटनासंबंधी विभागीय स्तरावर संनियंत्रण ठेवल्या जाते.

४. आगीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने संयुक्त वन व्यवस्थापन समिती/वन संरक्षण समित्यांना सक्रियरित्या सहभागी करण्यात येते. स्थानिक लोकांची सभा आयोजीत केली जाते.

५. फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या संकेतस्थळावर १०३२९ अधिकारी/कर्मचारी यांची नोंदणी करण्यात आलेली आहे. त्याद्वारे सूचना मिळताच वेळीच आग जास्त फैलावू नये याबाबत कार्यवाही केली जाते.

६. लोकांकडून वन वनक्षेत्रातील वणव्यांची माहिती/तक्रार प्राप्त होण्यासाठी हॅलो फॉरेस्ट ही हेल्प लाईन सेवा टोल फ्री क्र. “१९२६” वर कार्यान्वित आहे.

७. आगीवर नियंत्रण मिळविण्याकरीता Fire Blower मशिनचा वापर करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुधनवाडी (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील चंदन वंदन या किल्ल्याला वनवा लागून संपूर्ण किल्ला जळून खाक झाल्याबाबत

**(१३) ३५३८ (१०-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधनवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील चंदन वंदन या किल्ल्याला वनवा लागून संपूर्ण किल्ला जळून नष्ट झाल्याचे दिनांक १७ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याला वनवा लावताना काही व्यक्तींनी स्वतः पाहिल्याबाबत श्री.सागर विठ्ठल ननावरे यांनी वाठार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून सदर तक्रारीवर प्रथमत: कोणताही प्रतिसाद न दिल्याने तसेच तक्रारदाराच्या पाठपुराव्यानंतरच पंचनामा करण्यात आला परंतु प्रत्यक्षात १५ हेक्टर क्षेत्राचा पंचनामा आवश्यक असतानाही केवळ ४ हेक्टर क्षेत्रापुरताच पंचनामा करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारदाराने याबाबत पोलीस अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता संबंधित पोलीस अधिकारी यांनी तक्रारदाराला त्यांच्यावरच तक्रार दाखल करण्यात येईल अशी दमदाटी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तक्रार करण्यास विलंब करुन तक्रारदारास दमदाटी करणाऱ्या संबंधित दोषी पोलीस अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गणेश नाईक (२४-०९-२०२५) :** (१) दुधनवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील चंदन वंदन या किल्ल्याला दिनांक १७/०४/२०२५ रोजी वणवा लागलेला नसून दिनांक ०७/०४/२०२५ रोजी वनवा लागलेला आहे. तसेच यामध्ये अंदाजे १४ हे. क्षेत्र जळीत झाले आहे.
(२) चंदन वंदन या किल्ल्यावर दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी वा त्यादरम्यान वनवा लागल्याची कोणत्याही स्वरुपाची लेखी तक्रार अथवा गुन्हा वाठार पोलीस ठाण्यात दाखल झालेला नाही. परंतु दिनांक ०७/०४/२०२५ रोजी लागलेल्या वनव्याची माहिती मिळताच वनकर्मचारी यांनी घटनास्थळी जावून वनगुन्हा नोंद करुन पंचनामा व पुढील आवश्यक कार्यवाही केलेली आहे. प्रत्यक्षात १४ हेक्टर वनक्षेत्र जळीत झाल्याबाबतची नोंद वन अपराध पहिले प्रतिवृत्त (PRO) मध्ये दिनांक ०७/०४/२०२५ मध्ये घेण्यात आलेली असून सदरचे प्रकरण मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोरेगाव यांचे न्यायालयामध्ये दाखल करण्यात आले आहे.
(३), (४), (५) सदरबाबत दुधनवाडी ता.कोरेगाव, जि.सातारा येथील चंदन वंदन किल्ल्याला वणवा लागून संपूर्ण किल्ला जळून नष्ट झाला असल्याबाबत वाठार पोलीस ठाणे येथे कोणत्याही स्वरुपाची लेखी तक्रार अथवा गुन्हा दाखल नाही.

---

## राज्यात "पोकरा"च्या धर्तीवर नवी कृषी योजना लागू करण्याचा प्रस्तावाबाबत

**(१४) ३६२९ (१७-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात 'पोकरा' योजनेच्या धर्तीवर आगामी पाच वर्षांसाठी रुपये २५,००० कोटींच्या नव्या कृषी योजनेची अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, नवीन कृषी योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केंव्हापासून होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१०-०९-२०२५) :** (१) व (२) होय, राज्यातील कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषी समृध्दी योजना राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.
(३) कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण करणे, मूल्य साखळी बळकट करणे, तसेच हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, हा कृषी समृध्दी योजनेचा उद्देश आहे. ही योजना "मागणीवर आधारीत योजना", "जिल्हा स्तरावरील स्थानिक गुंतवणूक गरजांसाठी जिल्हा

निधी" आणि "राज्यस्तरीय प्रकल्प, संशोधन आणि बळकटीकरण" या तीन भागात विभागण्यात आली आहे. ही योजना सन २०२५-२६ पासून राबविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या वन विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(१५) ४१२६ (१७-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यासंदर्भातील २०१७ च्या शासन निर्णयात दिलेल्या मार्गदर्शक तत्वाकडे दुर्लक्ष करुन निवडक स्वरूपात बदल्यांचे धोरण राबविले जात असल्याने परिणामी साईड पोस्टिंग म्हणून ओळखली जाणारी अनेक पदे वर्षानुवर्ष रिक्त राहत असल्याची बाब माहे मे, २०२५च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व वन विभागाने दिनांक २२ मे, २०१७ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार प्रादेशिक वन्यजीव, सामाजिक वनीकरण, संशोधन व प्रशिक्षण आणि मूल्यांकन या प्रत्येक विभागात अधिकारी कर्मचाऱ्यांनी किमान तीन वर्षे सेवा देण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शासन कोणती कारवाई करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२८-१०-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

महसूल व वन विभागाच्या दिनांक २२/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वन विभागातील सहाय्यक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल यांच्या बदली बाबत तरतूदी विहित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सरळसेवा व पदोन्नतीने नियुक्तीनंतर प्रथम पदस्थापना शक्यतो प्रादेशिक किंवा वन्यजीव शाखेत करण्याची तरतूद आहे. त्यानंतर प्रादेशिक शाखेत ३ वर्षाचा पदावधी पूर्ण केल्यानंतर शक्यतो सामाजिक किंवा वन्यजीव किंवा इतर शाखेत तसेच सामाजिक वनीकरण शाखेत ३ वर्षाचा पदावधी पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांना प्रादेशिक किंवा वन्यजीव किंवा इतर शाखेत व वन्यजीव शाखेत ३ वर्षाचा पदावधी पूर्ण केल्यानंतर प्रादेशिक किंवा सामाजिक किंवा इतर शाखेत बदली देण्याबाबत तरतूद आहे.

त्याअनुषंगाने वनविभागातील सहाय्यक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदाच्या उपलब्धतेनुसार बदल्या करण्यात येतात. शक्यतो प्रादेशिक, वन्यजीव, सामाजिक वनिकरण तसेच, इतर सर्व शाखातील पदे भरण्याची कार्यवाही पद उपलब्धतेनुसार करण्यात येते. वन विभागातील कार्यकारी पदासोबत अकार्यकारी पदे सुध्दा भरण्यात येतात. वन विभागातील सहाय्यक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल संवर्गातील मंजूर, भरलेली व रिक्त पदे यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | संवर्ग | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक वनसंरक्षक(कनिष्ठ श्रेणी) | २८९ | २६३ | २६ |
| २ | वनपरीक्षेत्र अधिकारी | ९९९ | ७७६ | २१५ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मातंग समाजाने आपल्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे महाआंदोलन केल्याबाबत

**(१६) ४१२९ (१७-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मातंग समाजाने आपल्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन केल्याचे दिनांक २० मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ ऑगस्ट, २०२४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भाने अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करणे यासह एकूण सात मागण्या शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील मागण्यांच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२२-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर ७ मागण्यांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२/०६/२०२५ रोजी बैठकीचे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त शासन पत्र, दिनांक ०७/०७/२०२५ अन्वये पुढील उचित कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वनक्षेत्रात घट होत असल्याबाबत

**(१७) ४१८५ (१७-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०१५ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचा दावा केला असून यावर कोटयवधी रुपयांचा निधी खर्च केला असला तरी राज्यात वन आच्छादनामध्ये केवळ १६.५३ चौ.कि.मी ची वाढ झाल्याचे माहे मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वनआच्छादन क्षेत्र कमी आहेत त्यातच वनांना वारंवार वणवा लागत असून गडचिरोली येथे वनाचे प्रमाण सर्वाधिक आहे या वणव्यामुळे वनक्षेत्र नष्ट होत आहेच त्यातच वनातील वन्यजीवांवर व आसपासच्या परिसरावर त्याचा विपरीत परिणाम होत असतो हे टाळण्यासाठी शासनाने कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करणार आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०४-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सन २०१५ ते २०१९ चा दरम्यान ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमात लावलेले वृक्ष अजून लहान असून वनाच्छादन मध्ये योगदान करणेस असक्षम आहे. त्यांचे योगदान २० वर्षानंतरच लक्षात येणार आहे.

भारतीय वन स्थिती अहवाल २०२३ माहे डिसेंबर २०२४ अखेर प्रकाशित करण्यात आला आहे. सदर अहवालानुसार (ISFR) राज्यातील वनाच्छादनात (Forest Cover) २०२१ तुलनेत २०२३ मध्ये ५४.४७ चौ.कि.मी.ने घट झाली आहे.

| अहवाल वर्ष | २०२१ | २०२३ | बदल |
|---|---|---|---|
| वनाच्छादन (चौ.कि.मी.मध्ये) | ५०९१३ | ५०८५८.५३ | -५४.४७ |

परंतु मागील १० वर्षात (२०१३ ते २०२३) राज्याच्या वनाच्छादनात (Forest Cover) एकूण २२७ चौ.कि.मी. (२२.७०० हे.) व वृक्षाच्छादनात (Tree Cover) ५३८३ चौ.कि.मी. (५.३८,३०० हे.) ने वाढ झाली आहे.

(२) ISFR च्या अहवालानुसार महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. असून (Forest Area) सन २०२३ मध्ये वनाच्छादित (Forest Cover) क्षेत्र ५०८५८.५३ चौ.कि.मी. इतके आहे. यामध्ये गडचिरोली वनवृत्ताचे भौगोलिक क्षेत्र १४४१२ वर्ग कि.मी. असून त्यापैकी वनाच्छादित क्षेत्र १००१५.४८ वर्ग कि.मी. आहे.

राज्यात जानेवारी-२०२५ ते जून-२०२५ या कालावधीमध्ये वनवणव्याच्या एकूण ८०५८ इतक्या घटना घडलेल्या आहेत व २३६२३.२० हे. इतके जळीत क्षेत्र आहे. गडचिरोली वनवृत्तात जानेवारी-२०२५ ते जून-२०२५ या कालावधीमध्ये वनवणव्याच्या एकूण १८५९ इतक्या घटना घडलेल्या आहेत व १७९४.६६ हे. इतके जळीत क्षेत्र आहे. या वनवणव्यामुळे गडचिरोली वनवृत्तामध्ये वनक्षेत्र नष्ट झालेले नसून वन जमिनीवरील पाला पाचोळा जळालेला आहे. जंगलामध्ये वणवे लागण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

मोहाफुले गोळा करण्याकरीता, तेंदुपाने संकलनाकरीता, वनालगत शेतातील राब जाळण्याकरीता, वनक्षेत्रातील अतिक्रमणाकरीता तसेच नव्याने गवत वाढविण्याकरीता मानवनिर्मीत वनवणवा लावला जातो.

सदर घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व वणव्यास प्रतिबंध घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात : -

१. वनक्षेत्राच्या बाहय सीमांवर अग्निशामक रेषा तयार करणे, अग्निशमन पथकाची स्थापना करणे, अग्निशमन निरीक्षकाची नियुक्ती करण्यात येते.
२. आगीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने संयुक्त वन व्यवस्थापन समिती/वन संरक्षण समित्यांना सक्रियरित्या सहभागी करण्यात येते. स्थानिक लोकांची सभा आयोजीत केली जाते.
३. फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या संकेतस्थळावर १०३२९ अधिकारी/कर्मचारी यांची नोंदणी करण्यात आलेली आहे

४. लोकांकडून वन वनक्षेत्रातील वणव्यांची माहिती/तक्रार प्राप्त होण्यासाठी हॅलो फॉरेस्ट ही हेल्प लाईन सेवा टोल फ्री क्र. "१९२६" वर कार्यान्वित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर, गडचिरोली व नागरी वस्तीमध्ये फिरत असलेल्या रानटी हत्तीमुळे नागरिकांच्या जीवास धोका निर्माण झाल्याबाबत

**(१८) ४३७२ (१०-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा पट्टेदार वाघांमुळे प्रसिध्द असून सध्या चंद्रपूर, गडचिरोली व नागरी वस्ती क्षेत्रांमध्ये शेजारील राज्यातून स्थलांतरित झालेला एक रानटी हत्ती फिरत असून सदर रानटी हत्तीमुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेजारील राज्यातून स्थलांतरित झालेल्या रानटी हत्तीमुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस रक्षण करण्याच्यादृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०३-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील रानडुकर, हरीण, रानगवा, रोही, माकड तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून झालेल्या मनुष्यहानी नुकसानी, शेतपीक नुकसानी व पशुधन हानीकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी इजा किंवा नुकसान याकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम-२०२३ दिनांक ३०/०१/२०२४ अन्वये नुकसान भरपाई देण्यात येत आहे.

तसेच वन्यप्राणी हत्तीमुळे मानव-वन्यजीव संघर्ष होऊ नये याकरीता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

- संबंधित वनवृत्तातील संपूर्ण गावांबाबत हत्तीपासून सावधगिरी बाळगण्याबाबत सूचना देणारे बॅनर व भित्तीपत्रके लावण्यात आली आहे.
- हत्तीचे जवळपासचे परिसरात आगमण झाल्यास गावागावात लाऊड स्पिकरद्वारे मुनारी देण्यात येते.
- हत्तीचे आगमण झाल्यावर संपूर्ण क्षेत्रिय वनकर्मचारी, वनमजुर व पीआरटी चमू यांचेसह परिक्षेत्र स्तरावर विशेष पथकाची नियुक्ती करून सामुहिक गस्त करून त्यांच्या हालचालीवर पाळत ठेवणे व गावकऱ्यांना वेळोवेळी सावध करण्यात येते.
- रात्रीच्या वेळी ड्रोन कॅमेरा द्वारे हत्तीचा मागोवा घेण्यात आला.
- जेंव्हा जेंव्हा हत्तीचे आगमण झाले तेंव्हा तेंव्हा तात्काळ पोलीस विभाग, गावातील पोलीस पाटील, सरपंच, तंटा मुक्ती अध्यक्ष यांना सुध्दा सूचना देण्यात आल्या.
- हत्तीचे आगमणाची माहिती तात्काळ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावी म्हणून परिक्षेत्रातील लोकल व्हॉट्सॲप ग्रुपवर व वर्तमानपत्रातून तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत वारंवार माहिती देण्यात आली.

- हत्तींचा गावात शिरकाव होवू नये म्हणून मधमाशांचे आवाजाचे लाऊड स्पिकर, उग्र वासाचे टेंगे व नजीकच्या गावात गावकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून चर्चा करून सावधगिरी बाळगण्याबाबत सूचना देण्यात आली.
- बहुस्तर संरक्षण समित्या स्थापन केल्या, हत्तीच्या मार्गाचे GIS नकाशे तयार केले, थर्मल ड्रोन चा वापर, जनजागृती, STPF ची ट्रेकिंग टीम, नाईट बयनाकुलरचा पाठपुरावा इत्यादी
- ताडोबा व्याघ्र प्रकल्पात वन्यप्राणी संघर्ष प्रकरणी शीघ्र कार्यवाहीसाठी प्रशिक्षित PRT व RRT टीम कार्यरत असून त्यांचा वापर करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतमजूरांना रोजगार हमी योजनेमध्ये सामावून घेऊन त्यांना मोबदला देण्याबाबत

**(१९) ४३७५ (१७-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक भागांमध्ये शेतमजुरांना वर्षभर नियमित रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आर्थिक संकटात सापडून कर्जबाजारी होण्याचे प्रमाणात वाढ होत असून, आत्महत्येचे प्रमाणही वाढत असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतमजुरांना महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत (मनरेगा) समाविष्ट करून वर्षभरात किमान रोजगार व निश्चित मोबदला उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (२७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मागणी प्रधान योजना आहे. सन २०२४-२५ मध्ये ३००७१३९ कुटुंबातील ५११२३५६ सदस्यांमार्फत १६२१५७५७० मनुष्यदिवस निर्मिती करण्यात आलेली असून रुपये २५६६३७.८७ लाख मोबदला देण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अनुसूचित जातीचे वर्गीकरण लागू करण्याबाबत

**(२०) ४६४७ (२३-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेलंगणा राज्याने अनुसूचित जातीचे (एससी) वर्गीकरण लागू करून देशात पहिल्या क्रमांक पटकवला असून त्याच प्रमाणे राज्यातही या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी अनुसूचित जातीच्या समूहाने केली असल्याचे बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास

आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जातीचे (एससी) वर्गीकरण लागू करण्यासाठी शासनाने तेलंगणा राज्याचा अभ्यास करून राज्यातही सदर योजना लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा उपवर्गीकरणाचा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १५/१०/२०२४ अन्वये मा.न्या.श्री.अनंत मनोहर बदर (से.नि.), मा.उच्च न्यायालय, पाटणा यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस शासन निर्णय, दिनांक १२/०९/२०२५ अन्वये दिनांक १४/०३/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून प्रस्तुत प्रकरणी समितीस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.